नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २८१ Issue - 281 | वार सोमवार दि. २ मार्च २०२६ Blow- Monday Date 2 March 2026 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या त्यागाचा देश सदैव ऋणी : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह




## महाराष्ट्र आणि पंजाबमधील अध्यात्मिक व ऐतिहासिक संबंध - बाबा हरनाम सिंग जी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी मुंबई : 'हिंद दी चादर' म्हणून संपूर्ण देशात आदराने ओळखले जाणारे श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे हौतात्म्य हे केवळ शीख समाजासाठी नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांच्या रक्षणासाठी आपले शीर अर्पण केले. देश त्यांच्या या त्यागाचा सदैव ऋणी राहील, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.

अल्पसंख्याक विकास विभाग आणि राज्यस्तरीय समागम समिती यांच्या वतीने नवी मुंबईतील खारघर येथे 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमात गृहमंत्री शाह बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अखिल भारतीय धर्मजागरणचे प्रमुख शरदराव ढोले, शहिदी समागम समितीचे मार्गदर्शक बाबा हरनाम सिंह जी, मुखी, दमदमी टकसाल, प्रधान संत समाज, बंजारा समाजाचे धर्मगुरू बाबूसिंग महाराज, राज्यस्तरीय समनव्य समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, राज्यस्तरीय समन्वय समितीचे निमंत्रक बल मलकित सिंह आदी उपस्थित होते.

या उपक्रमाचे महत्त्व विषद करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, प्रत्येक गुरुद्वारा आणि प्रत्येक वस्तीपर्यंत 'हिंद दी चादर'चा संदेश पोहोचविण्यासाठी बाबा हरनाम सिंगजी यांनी मोठे कार्य केले आहे. राज्य शासनाने यापूर्वी नांदेड व नागपूर येथे आयोजित केलेल्या 'हिंद दी चादर' महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून नवी मुंबईतील कार्यक्रमात शीख बांधवांसह विविध समाजघटकांचा मोठा सहभाग असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शीख समाजासाठी सेवाकार्याची संधी साधत विविध प्रसंगी त्यांच्या परंपरा, श्रद्धा आणि योगदानाचा गौरव केला आहे. त्याच धर्तीवर देशभर 'हिंद दी चादर' पर्वाचे आयोजन करण्यात येत असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले.

यावेळी संत परंपरेचे स्मरण करताना त्यांनी पोहरादेवी येथील सेवालाल महाराज तसेच संत नामदेव महाराज यांना वंदन केले. संत नामदेव यांच्या रचनांचा समावेश गुरु ग्रंथ साहिबमध्ये झालेला आहे, ही भारतीय संतपरंपरेच्या व्यापकतेची साक्ष असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच संत रविदास यांसारख्या संतांच्या विचारांनाही गुरु ग्रंथ साहेबमध्ये स्थान मिळाले आहे, यावरून भारतीय अध्यात्माची सर्वसमावेशकता स्पष्ट होते, असे त्यांनी नमूद केले.

नववे श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या शहादतीचा विशेष उल्लेख करताना केंद्रीय गृहमंत्री शाह म्हणाले की, अन्याय आणि अत्याचारांविरोधात उभे राहून त्यांनी दिलेले शहिदत्व भारतीय इतिहासातील अत्यंत प्रेरणादायी घटना आहे. शीश दिया, पर सिर न झुकाया हीच शीख गुरुपरंपरेची ओळख असून भारताच्या अखंडतेचा तो आधार आहे.

शीख परंपरेतील नामजप, आराधना आणि लंगर यांचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, या मूल्यांमधून समाजातील समरसता आणि बंधुभाव दृढ होतो. गुरु गोविंद सिंह यांच्या काळात खालसा पंथाची स्थापना झाली आणि धर्मरक्षणासाठी अद्वितीय त्यागाची परंपरा अधिक बळकट झाली. त्यांच्या चारही सुपुत्रांच्या शहादतीनेही या परंपरेला अमरत्व प्राप्त झाले, असे त्यांनी नमूद केले.

आनंदपूर साहिबसारख्या पवित्र स्थळांचा उल्लेख करत केंद्रीय गृहमंत्री शाह म्हणाले की, अन्यायकारक फर्मानांसमोर न झुकता गुरूंनी दाखवलेले साहस भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदले गेले आहे. नववे गुरु श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागमाचा संदेश महाराष्ट्र शासन राज्यातील छोट्या-छोट्या गावांपर्यंत पोहोचवत आहे, याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन केले. भारताची संस्कृती 'सर्व धर्म समभाव' या तत्वावर आधारलेली आहे. ही परंपरा जपण्यासाठी शीख गुरूंनी केलेले योगदान अमूल्य आहे. अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध उभे राहणे हीच खरी देशभक्ती असल्याचे केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी यावेळी सांगितले.

स्वातंत्र्यानंतरही देशाच्या सुरक्षेसाठी शीख जवानांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले. एक भारत, श्रेष्ठ भारत या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी अशा ऐतिहासिक कार्यक्रमांची गरज आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी शहिदी समागम समितीचे मार्गदर्शक बाबा हरनाम सिंग जी, मुखी, दमदमी टकसाल, प्रधान संत समाज यांच्या हस्ते केंद्रीय मंत्री शाह यांना जफरनामा देऊन सत्कार करण्यात आला.

राज्य समन्वय समितीचे मार्गदर्शक बाबा हरनाम सिंग म्हणाले की, नागपूर आणि तख्त सचखंड श्री हजूर साहिब, नांदेडनंतरचा हा तिसरा आणि सर्वात मोठा कार्यक्रम ऐतिहासिक उत्साहात पार पडला. यावेळी महाराष्ट्र आणि पंजाबमधील अध्यात्मिक व ऐतिहासिक संबंधांना उजाळा दिला.

भारतीय संस्कृतीवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी सर्वोच्च बलिदान दिले. त्यांच्या या बलिदानामुळेच आज भारतीय संस्कृती सुरक्षित आहे. संत नामदेव महाराज आणि गुरु नानक देव जी यांच्या काळापासून हे दोन्ही प्रांत जोडलेले आहेत. दहावे गुरु श्री गुरु गोविंद सिंह जी यांनी पंजाबमधून येऊन नांदेडच्या पावन भूमीवर वास्तव्य केले, ज्यामुळे हे नाते अधिक घट्ट झाले आहे. महाराष्ट्र शासनाने अतिशय स्तुत्य निर्णय घेतले आहेत. ब्रिटीश काळापासून सिखलीगर समाजावर लादलेले निर्बंध हटवून त्यांना सन्मानाचे आणि समानतेचे अधिकार देण्याचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

**राज्य शासनाच्या सहकार्याने जनजागरण- शरदराव ढोले**

अखिल भारतीय धर्मजागरण मंचाचे प्रमुख शरदराव ढोले यांनी प्रास्ताविकात संत नामदेव महाराजांच्या पंजाब-महाराष्ट्रातील आध्यात्मिक नात्याचा उल्लेख केला आणि वारकरी, सिंधी, मोहियाल तसेच गुरु नानकांना गुरु मानणाऱ्या विविध समाजघटकांना एकत्र आणण्याचा हा प्रयत्न असल्याचे सांगितले. उदासीन संप्रदायाच्या सहभागासह महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने ९६ रथांच्या माध्यमातून सुमारे २० हजार गावांमध्ये जनजागरण करण्यात आले असून ५०० हून अधिक पूर्णकालीन कार्यकर्त्यांच्या तीन महिन्यांच्या परिश्रमातून हा भव्य कार्यक्रम यशस्वी झाल्याचे त्यांनी नमूद केले.

# श्री गुरु तेग बहादुरांच्या शौर्याची परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हीच खरी सेवा : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी मुंबई/खारघर : महाराष्ट्राच्या पवित्र भूमीवर 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० वा शहिदी समागमाच्या माध्यमातून आपण महान परंपरेचे साक्षीदार होत आहोत. गुरुंनी दिलेला त्याग आणि सामाजिक एकतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे, असा संदेश प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ध्वनिचित्रफितीद्वारे दिला.

अल्पसंख्याक विकास विभाग आणि राज्यस्तरीय समागम समितीच्या वतीने खारघर येथे 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्रधानमंत्री मोदी यांचा संदेश ध्वनिचित्रफितीद्वारे दाखविण्यात आला.

प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितले की, गुरुंनी त्यागाची पराकाष्ठा केली. त्या काळात समाजातील सर्व घटक एकत्र उभे राहिले. सत्य आणि संस्कृतीसाठी ठाम राहण्याची प्रेरणा समाजाला मिळाली. या सामाजिक एकतेच्या महायज्ञात गुरु गोविंद सिंह आणि गुरु नानक नाम लेवा संगत यांची महत्त्वाची भूमिका होती. आज देशाला पुन्हा सामाजिक एकतेची गरज असताना हा समागम आश्वासक ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या यात्रेची सुरुवात गेल्या वर्षी नागपूर येथून झाली. त्यानंतर तख्त श्री हजूर साहिब, नांदेड येथे कार्यक्रम पार पडला आणि आता नवी मुंबईत हा समागम महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. या उपक्रमाद्वारे श्री गुरु तेग बहादुर यांचा शौर्यपूर्ण इतिहास महाराष्ट्रातील हजारो गावांपर्यंत पोहोचविण्यात आला आहे. या आयोजनाबद्दल प्रधानमंत्र्यांनी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन केले.

देशभरात श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानाच्या स्मरणार्थ मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम होत असल्याचे सांगत हरियाणातील कुरुक्षेत्र येथे झालेल्या भव्य कार्यक्रमात सहभागी होण्याचा अनुभव त्यांनी सांगितला. केंद्र सरकार गुरु श्री तेग बहादुर यांच्या संबंधित प्रत्येक ऐतिहासिक प्रसंग राष्ट्रीय स्तरावर साजरा करत आहे. ४००वा प्रकाश पर्व, स्मृतिचिन्ह टपाल तिकीट आणि विशेष नाण्याचे प्रकाशन, तसेच गुरु नानक देव यांचा ५५०वा प्रकाश पर्व श्रद्धेने साजरा करण्यात आल्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. साहिबजाद्यांच्या सन्मानार्थ 'वीर

**'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमात ध्वनिचित्रफितीद्वारे प्रधानमंत्र्यांचा संदेश**

बाल दिवस' साजरा करण्याची परंपराही सुरू करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. शीख समाजासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती देऊन सांगितले की, करतारपूर साहिब कॉरिडॉर विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आला. श्री हेमकुंड साहिब यात्रेसाठी सुविधा उभारण्यात आल्या. शीख संघटना आणि गुरुद्वारांशी संबंधित संस्थांना एफसीआरए अंतर्गत सवलती देण्यात आल्या. शीख इतिहासाला अभ्यासक्रम आणि सांस्कृतिक चर्चेत स्थान देण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले. अफगाणिस्तानातील शीख बांधवांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आणि गुरु ग्रंथ साहिब यांच्या सन्मानासाठी सरकारने मिशन मोडमध्ये काम केले. गुरु ग्रंथ साहिबांचे स्वरूप सुरक्षितपणे भारतात आणण्यात आले. जम्मू-काश्मीरमधील शीख कुटुंबांसाठी पुनर्वसन पॅकेज लागू करण्यात आले, असेही त्यांनी सांगितले.

शीख समाजाच्या श्रद्धेचा सन्मान आणि त्यांच्या प्रगतीसाठी नवे मार्ग निर्माण करणे ही आमची जबाबदारी असून ही सेवा करण्याचे आम्हाला सौभाग्य लाभले आहे, असे नमूद करत त्यांनी नवी पिढी गुरुंच्या साहस आणि सत्याच्या मूल्यांशी जोडली गेली पाहिजे, असे आवाहन केले. इतिहास केवळ स्मरणात न ठेवता तो आचरणात आणणे हेच या समागमाचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

# नागपूरच्या काटोलमध्ये स्फोटके बनवणाऱ्या कंपनीत भीषण स्फोट; १२ कामगारांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील राऊळगाव येथून एक अतिशय मोठी बातमी समोर आली आहे. राऊळगाव येथे असलेल्या डइङ कंपनीत सकाळी ७ वाजताच सुमारास मोठा स्फोट झालाय. बारुद आणि त्यापासून डेटोनेटरसह इतर स्फोटक बनवणाऱ्या कंपनीत हा मोठा स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान या भीषण स्फोटात १२ कामगारांचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. तर अनेक जण जखमी झाल्याचीही माहिती आहे.

दरम्यान, या भीषण स्फोटानंतर परिसरात मोठा आवाज होऊन एकच खळबळ उडालीय. तर या भीषण स्फोटात जखमी कामगारांना जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले आहे. तर मोठ्या प्रमाणात झालेल्या स्फोटनंतर परिसरात आगही लागली आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्नीशामक विभगाकडून बचावकार्य सुरु करण्यात आलं आहे. दुसरीकडे परिसरात मृतकांच्या नातेवाईकांनी परिसरात मोठी गर्दी केल्याचे पाहायला मिळत आहे. नागरिकांमध्ये मोठा रोष उसळल्याचेही चित्र आता बघायला मिळत आहे. डइङ कंपनीत सकाळी ७ वाजताच सुमारास हा स्फोट झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मात्र या स्फोटाचे नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. दरम्यान, या स्फोटाच्या अपघातावर काटोलचे आमदार चरणसिंग ठाकूर यांनी १५ मृत्यू आणि २० जखमी झाले असल्याचे सांगितले आहे.

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत हिंद दी चादर कार्यक्रमाचे खारघरमध्ये भव्य आयोजन**

**नवी मुंबईत श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या नावाने रुग्णालय उभारणार -मुख्यमंत्री**

# शालेय अभ्यासक्रमात श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानाच्या इतिहासाचा समावेश करणार : मुख्यमंत्री फडणवीस




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी मुंबई, दि. १ : 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी धर्म व संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेली शहादत ही जगाच्या इतिहासातील अद्वितीय घटना आहे. त्यांच्या बलिदानाची गाथा केवळ एका कार्यक्रमापुरती मर्यादित न राहता ती पुढील पिढीपर्यंत पोहचली जावी. यासाठी शालेय अभ्यासक्रमात श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानाच्या इतिहासाचा समावेश केला जाणार आहे. तसेच नवी मुंबई परिसरात त्यांच्या नावाने रुग्णालय उभारण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

अल्पसंख्याक विकास विभाग आणि राज्यस्तरीय समागम समिती यांच्या वतीने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत खारघर येथे 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शीख समाजाचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी भारतीय संस्कृती वाचवण्यासाठी १६७५ मध्ये आपले बलिदान दिले. त्यांच्या या बलिदानामुळे आज आपण स्वाभिमानाने आपली श्रद्धा जोपासू शकतो. त्यांच्या या बलिदानाच्या स्मरणार्थ संपूर्ण महाराष्ट्रात शहिदी समागम आयोजित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला.

**श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे कार्य संपूर्ण मानवतेच्या इतिहासातील एक गौरवशाली पान - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, 'हिंद दी चादर' म्हणून ओळखले जाणारे, मानवतेचे रक्षक आणि महान त्यागी श्री गुरु तेग बहादुर साहीबजी यांचा त्याग मानवतेच्या इतिहासातील गौरवपूर्ण पर्व आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिबजींचे बलिदान हे केवळ इतिहास नाही, तर ते संपूर्ण मानवतेच्या इतिहासातील एक गौरवशाली पान आहे. संस्कृती, परंपरेच रक्षण करण्यासाठी श्री गुरु तेग बहादुर साहीबजी यांनी प्राणांची आहुती दिली. त्यांचे कार्य अतूट श्रद्धा आणि अतूट धैर्याचे उदाहरण आहे.

**श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांचे मानवतेसाठी अद्वितीय बलिदान आजही प्रेरणादायी - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार**

'हिंद दी चादर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवाधिकारांच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान आजच्या काळातही प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, सतराव्या शतकात अन्यायाविरुद्ध निर्भयपणे उभे राहून श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी भारताच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक अस्मितेचे रक्षण केले. त्यांच्या त्यागाचे स्मरण करणे आणि त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे, हीच या समागम कार्यक्रमाची खरी प्रेरणा आहे.

यावेळी वनमंत्री गणेश नाईक, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, राज्यस्तरीय समन्वय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, अखिल भारतीय धर्मजागरणचे प्रमुख शरदराव ढोले, शहिदी समागम समितीचे मार्गदर्शक बाबा हरनाम सिंह जी, मुखी, दमदमी टकसाल, प्रधान संत समाज, बंजारा समाजाचे धर्मगुरू बाबूसिंग महाराज, राज्यस्तरीय समन्वय समितीचे निमंत्रक बल मलकित सिंह, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार मंदाताई म्हात्रे, मुंबईच्या महापौर रितू तावडे, पनवेलचे महापौर नितीन पाटील, आदी उपस्थित होते.

## संपादकीय....

# श्री गुरु तेग बहादूर साहिबजी

महाराष्ट्राच्या पवित्र भूमीवर 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० वा शहिदी समागमाच्या माध्यमातून आपण महान परंपरेचे साक्षीदार होत आहोत. गुरुंनी दिलेला त्याग आणि सामाजिक एकतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. अल्पसंख्याक विकास विभाग आणि राज्यस्तरीय समागम समितीच्या वतीने खारघर येथे 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्रधानमंत्री मोदी यांचा संदेश ध्वनिचित्रफितीद्वारे दाखविण्यात आला. गुरुंनी त्यागाची पराकाष्ठा केली. त्या काळात समाजातील सर्व घटक एकत्र उभे राहिले. सत्य आणि संस्कृतीसाठी ठाम राहण्याची प्रेरणा समाजाला मिळाली. या सामाजिक एकतेच्या महायज्ञात गुरु गोविंद सिंह आणि गुरु नानक नाम लेवा संगत यांची महत्त्वाची भूमिका होती. आज देशाला पुन्हा सामाजिक एकतेची गरज असताना हा समागम आश्वासक ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. या यात्रेची सुरुवात गेल्या वर्षी नागपूर येथून झाली. त्यानंतर तख्त श्री हजूर साहिब, नांदेड येथे कार्यक्रम पार पडला आणि आता नवी मुंबईत हा समागम महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. या उपक्रमाद्वारे श्री गुरु तेग बहादुर यांचा शौर्यपूर्ण इतिहास महाराष्ट्रातील हजारो गावांपर्यंत पोहोचविण्यात आला आहे. या आयोजनाबद्दल प्रधानमंत्र्यांनी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन केले. देशभरात श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानाच्या स्मरणार्थ मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम होत असल्याचे सांगत हरियाणातील कुरुक्षेत्र येथे झालेल्या भव्य कार्यक्रमात सहभागी होण्याचा अनुभव त्यांनी सांगितला. केंद्र सरकार गुरु श्री तेग बहादुर यांच्या संबंधित प्रत्येक ऐतिहासिक प्रसंग राष्ट्रीय स्तरावर साजरा करत आहे. ४००वा प्रकाश पर्व, स्मृतिचिन्ह टपाल तिकीट आणि विशेष नाण्याचे प्रकाशन, तसेच गुरु नानक देव यांचा ५५०वा प्रकाश पर्व श्रद्धेने साजरा करण्यात आल्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. साहिबजाद्यांच्या सन्मानार्थ 'वीर बाल दिवस' साजरा करण्याची परंपराही सुरू करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. शीख समाजासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती देऊन सांगितले की, करतारपूर साहिब कॉरिडॉर विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आला. श्री हेमकुंड साहिब यात्रेसाठी सुविधा उभारण्यात आल्या. शीख संघटना आणि गुरुद्वारांशी संबंधित संस्थांना एफसीआरए अंतर्गत सवलती देण्यात आल्या.

# कोयना प्रकल्प म्हणजेच महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


कोयना धरण हें महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील कोयना नगर येथे स्थित असून, हें राज्यातील सर्वात मोठ्या धरणांपैकी एक आहे. या धरणाला महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी असेही संबोधले जाते.

१ मार्च

कोयना जलविद्युत प्रकल्प एक दूरदर्शी प्रकल्प उभारणी

कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या उभारणीस १ मार्च १८५८ रोजी सुरुवात झाली. महाराष्ट्रातील कोयना प्रकल्प हे महाराष्ट्राचे एक भूषण. प्रत्येकजण त्याच्या विषयी अभिमानाने बोलतो. त्याचे अतिविशाल रूप नजरेत साठवून घ्यायला आवर्जून जातो. त्याचे ते भव्यदिव्य रूप मनात कोरले जातेही; परंतु ते रूप नेमके कसे आकाराला आले, कोणी ते आव्हान पेलले, काय काय घडले असेल ते प्रत्यक्षात साकारताना हा कोयना धरणाचा रोमांचित करणारा इतिहास मात्र आपल्याला फारसा माहीत नसतो. 'महाराष्ट्राचे शक्तिपीठ कोयना प्रकल्प' या पुस्तकाच्या रूपाने तो वाचका समोर उभा करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. एखादा सरकारी प्रकल्प म्हटले की जगड्व्याळ कागदपत्रे, फायलींचा ढीग, खूपच तांत्रिक आणि किचकट लिखणाची जंत्री असे सारे चित्र डोळ्या समोर येते. पाहा कसा साकारला हा प्रकल्प! म्हणजे मग त्याच्याबद्दल जाणून घेण्याची सामान्यजनांची उत्सुकता तिथेच मान टाकते. पण तोच इतिहास कॉफी-टेबल बुक स्वरूपात समोर आला तर तो पाहायला आणि वाचायलाही रंजक होतो. कोयना धरणावरील अशा प्रकारचे नितांतसुंदर पुस्तक अलीकडेच प्रसिद्ध झाले आहे. त्यात कोयना प्रकल्पाची अत्यंत आधुनिक पद्धतीने आणि त्याच्या इतिहासा बरोबरच अनेक तांत्रिक अंगांची माहितीही जलसंपदा विभागाने इमेज इंडियाच्या माध्यमातून मांडली आहे. त्यामुळे कोयनचा रोमांचकारी इतिहास वाचायला आणि पाहायलादेखील वाचकाला आवडेल.

कोयना जलविद्युत प्रकल्प ही महाराष्ट्राची भाग्यरेषा मानली जाते. त्याला सुमारे १०० वर्षांचा इतिहास आहे. या वाटचालीत अनेक अडथळे आले. त्याच्या पूर्ततेमागे लोकांचे अतोनात कष्ट आहेत. त्याच्या उभारणीच्या वेळी झालेल्या काही अपघातांमध्ये अनेक जण बळीही गेले आहेत. त्यामुळे या प्रकल्पाचे प्रेरणादायी नियोजन आणि उभारणी ही कोयना प्रकल्प समजून घेण्यासाठी येणाऱ्या पिढ्यांकरता निश्चितच मार्गदर्शक ठरेल. महाराष्ट्राचे भवितव्य कोयनेने घडवले आहे. १९०१-०२ पासून खरे तर कोयना प्रकल्पाच्या प्रवासास सुरुवात झाली. त्याकाळी सततचा दुष्काळ, पाण्याअभावी जळणारी पिके, वाढते दारिद्र्य, पसरणारी रोगराई, शेतसाऱ्याने पिचलेला शेतकरी अशी महाराष्ट्रात स्थिती होती. या परिस्थितीबद्दल ब्रिटिश राजवटी विरुद्ध जनतेच्या मनात संताप धुमसत होता. सह्याद्रीच्या कडेकपारीतल्या नद्यांनीच त्यावर काही अंशी दिलासा दिला असता. या समस्येवर उपाय शोधण्यासाठी म्हणून एच.एफ. बील यांनी कोयनेची परिक्रमा सुरू केली. तेव्हाच्या मुंबई प्रांताचे ते सिंचन विभागाचे अधीक्षक अभियंता होते. मुंबई प्रांताची तहान भागविण्यासाठी काहीतरी करणे आवश्यक होते. कराड, सांगली, जत पासून विजापूर पर्यंतच्या दुष्काळी पट्ट्याला पाणी कसे देता येईल, याची पाहणी करण्यासाठी त्यांनी कृष्णा आणि कोयनेच्या मुळाशी जाण्याचे ठरविले.



महाबळेश्वरच्या दक्षिणेकडे वशिंडा पर्वत शिखरात सुमारे १३५० मीटर उंचीवर कोयना उगम पावते. तेथून ती १२५ किलोमीटर लांबीचा प्रवास करते. तिच्या दोन्ही बाजूंना उंचच उंच डोंगररांगा आहेत आणि त्यात मुसळधार पाऊस पडतो, हे बील यांनी हेरले. कोयनेवर धरण होऊ शकते, हे बील यांनी १९०९ साली मुंबई प्रांताच्या सरकारला सादर केलेल्या अहवालात स्पष्ट केले. मात्र, प्रश्न फक्त पाण्याचाच नव्हता. मधल्या काळात विजेची मागणीही वाढू लागली होती. त्यादृष्टीनेही कोयना नदीचे स्थान यथोचित होते. कोयना खोऱ्याच्या एका बाजूस सह्याद्रीची २००० ते ३००० फूट खोल दरी आहे. त्यामुळे कोयनेच्या खोऱ्यात जलविद्युत प्रकल्प उभारण्यासाठी १९१७ ते १९२४ दरम्यान सर्वेक्षण करण्यात आले. यानंतर १९४६ मध्ये एक समिती स्थापन करण्यात आली. मात्र, निधीची अडचण उभी राहिली. त्यावर केंद्राने एक समिती स्थापन केली. अखेर १६ जानेवारी १९५४ रोजी मुंबई प्रांताचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्या हस्ते कोयना प्रकल्पाचे भूमिपूजन झाले. १९५८-५९ मध्ये या प्रकल्पाचा टप्पा १ आणि २ ची कामे पूर्ण झाली आणि १६ मे १९६२ ला कोयना प्रकल्पातून प्रत्यक्ष वीजनिर्मिती सुरू झाली.

कोयना प्रकल्पाचा हा प्रवास सोपा खचितच नव्हता. त्यात अनेकानेक अडचणी आल्या. तांत्रिक अडचणी तर होत्याच; शिवाय राजकीय अडथळेही होतेच. स्वातंत्र्यानंतर कोयना प्रकल्पाच्या मागणीला सरकार दरबारी ताकद मिळावी म्हणून अनेक उद्योजक पुढे आले. तेव्हा द्वैभाषिकप्रांतातील राजकारण, खर्च, मंजुरी आणि आंतरराज्य पाणीवाटपाचा मुद्दा अशा अडचणी या प्रकल्पाच्या आड येत होत्या. अशा अनेक समस्यांवर मात करण्याच्या दृष्टीने भाऊसाहेब हिरे, डॉ. धनंजयराव गाडगीळ, आ.रा. भट, शंकरराव किलरेस्कर यांच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान पं. नेहरूंची भेट घेतली. यानंतरच नियोजन मंडळाने कोयना प्रकल्पाला मंजुरी दिली. तथापि त्यानंतरच सर्वाधिक अवघड टप्प्याला सुरुवात झाली. कोयनेच्या खोऱ्यात अक्षरश: डोंगर फोडून कोयना प्रकल्पाचे शिल्प साकारायचे होते. हे प्रचंड आव्हान अनेक अभियंत्यांनी मिळून स्वीकारले. अत्यंत विपरित परिस्थितीत नैसर्गिक संकटांशीही त्यांनी अनेकदा सामना केला. कोयना खोऱ्यातील अनेक गावे बुडिताखाली जाणार असल्याने त्यांचे पुनर्वसनही प्रकल्पाच्या काम बरोबरच सुरू झाले.

मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते १ मार्च १९५८ रोजी धरणाच्या कामास प्रारंभ झाला. कोयना धरणाच्या बांधकामात तब्बल ५३ स्तंभ उभारण्यात आले आहेत. १९६४ पर्यंत धरणाचे बांधकाम पूर्ण झाले. १९६१ च्या पावसाळ्यात पहिल्यांदा धरणात पाणी साठले.

यानंतरचा टप्पा जलविद्युत निर्मितीचा होता. विद्युतगृह जमिनीवर की डोंगराच्या पोटात उभारावे, यावर १९५१ पासून खल सुरू होता. मात्र, बोगदे आणि विद्युतगृहही भूमिगत बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. देशातील हा अशा प्रकारचा पहिलाच प्रयोग होता. त्यामुळे अभियंत्यांची ती एक प्रकारे कसोटीच होती. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगातील शक्तीची आराधना या अभियंत्यांनी केलेली असल्याने हे आव्हान त्यांनी लीलया पेलले. कोयना प्रकल्पाने भूकंपासारखी भीषण नैसर्गिक आपत्तीही झेलली. तेव्हा अनेक चर्चांना ऊत आला होता. परंतु कोयनेच्या शिल्पकारांनी हाही धक्का पचवला आणि प्रकल्पाच्या मजबुतीकरणाचे काम पूर्ण झाले. पहिल्या दोन टप्प्यांनंतर कोळकेवाडीचा तिसरा टप्पा पार पडला. तेथेही भूमिगत वीजगृह बांधून. वीजनिर्मिती सुरू करण्यात आली. नंतर अधिक वीज निर्मितीसाठी चौथ्या टप्प्याचे कामही सुरू झाले. यातील लेक टॅपिंगच्या कामाने भारतीय अभियांत्रिकीचे श्रेष्ठत्व जागतिक पातळीवर सिद्ध केले. या टप्प्यातील मिशन ३१ मार्च १९९९ ला पूर्ण झाले आणि त्यामुळे कोयनेच्या वीजनिर्मितीत १००० मेगावॉटची वाढ झाली. आता ओझर्डे धबधब्यावरून १००० फूट कोसळणाऱ्या पाण्याचा वापर करण्यासाठी कोयनेचा पाचवा टप्पा आखण्यात आला आहे. भविष्यात असे अनेक टप्पे प्रत्यक्षात आकारास येतील.

कोयनेने महाराष्ट्राला खूप काही दिले आहे. १९६२ पासून आजपर्यंत कोट्यवधी युनिट वीजनिर्मिती बरोबरच हजारो हेक्टर जमीन या प्रकल्पामुळे सिंचनाखाली आली. कोयनेच्या जलाशयामुळे सह्याद्रीच्या खोऱ्यातील पर्यावरणाचे संरक्षण झाले. नवे तंत्रज्ञान स्वीकारून कोयना प्रकल्पाने वैराण प्रदेश संपन्न केला गेला. हा सर्व रोमांचित करणारा इतिहास 'महाराष्ट्राचे शक्तिपीठ कोयना प्रकल्प' या जाडजूड ग्रंथामधून आपल्यासमोर उभा राहतो. कोयनेचा पहिला आणि दुसरा टप्पा सुरू असताना या वाटचालीचा इतिहास लिहिण्याची तत्कालीन अभियंता पी.एम. माने यांची इच्छा होती. त्यावेळी त्यांनी एक मंडळ स्थापन करून दोन खंडांत अहवाल लिहिला. परंतु या प्रकल्पाचा इतिहास लिहिला जावा अशी त्यांची इच्छा होती. २०१२ मध्ये त्याला सरकारी मान्यता मिळाली. कोयना प्रकल्पाचे मुख्य अभियंता (स्थापत्य) दीपक मोडक, म.दि. पेंडसे, वि.ज. वाघ, के.एस. देशपांडे यांच्या तज्ज्ञ समितीने पुस्तकाबाबत इमेज मीडियाला मार्गदर्शन केले. इमेज मीडियाच्या टीमने अनेक संदर्भ शोधून, प्रत्यक्ष प्रकल्पाला भेटी देऊन सारी माहिती मिळवली. सुमारे १०६ तांत्रिक शासकीय अहवाल, पुण्यातील विविध ग्रंथालये, तत्कालीन वृत्तपत्रीय वृत्तलेख यांचाही धांडोळा घेतला आहे. सुमारे पाच हजार छायाचित्रे संकलित केली गेली. त्यापैकी अनेक छायाचित्रे प्रत्यक्ष जागेवर जाऊन काढली गेली आहेत. त्यापैकी अनेक चित्रांचा समावेश या पुस्तकात आढळतो. अशा प्रकारच्या पुस्तकात प्रथमच माहिती सोप्या पद्धतीने देण्यासाठी इन्फोग्राफिकचा वापर केला गेला आहे. तांत्रिक माहितीसोबतच तेव्हाच्या अनेक घटना यात मांडण्यात आल्या आहेत. कोयना प्रकल्प हा निव्वळ एक जलप्रकल्प नसून महाराष्ट्रातील लोकभावनांशी निगडित हृदयस्थ बाब आहे. कोयना प्रकल्पाचा १९०१ पासून जानेवारी २०१४ पर्यंतचा अखंड प्रवास या पुस्तकात उभा केलेला आहे.

महाराष्ट्राचे शक्तिपीठ कोयना प्रकल्प
कॉफी-टेबल बुक, निर्मिती- इमेज इंडिया
पृष्ठे - २९५

**- वृत्त : प्रफुल्ल शेवाळे / विजय घनघाव**

# युवकांनो दारू न पिता धुलिवंदनाची मजा लुटा - विश्वरत्न रामटेके



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : होळी हा सण रंगांचा प्रेम आणि वसंत ऋतूचा सण आहे. होळी हा सण वाईटावर चांगल्याच्या विजयाचा प्रतीक मानले जाते. त्यामुळे दारूच्या नशेत राहून होळीसारख्या सणाचे पावित्र्य भंग करू नका. दारू न पिता रंग उधळत आपल्या कुटुंबासोबत, मित्रांसोबत आनंदाने सण साजरा करावा, असे आवाहन युवा सामाजिक कार्यकर्ते विश्वरत्न रामटेके यांनी केले आहे.

अनेक युवक धुलिवंदनाचा आनंद साजरा करण्याच्या नादात मित्रांच्या आग्रहातून दारूचा पहिला घोट घेतात. आणि यातूनच दारूच्या व्यसनाची सुरुवात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

निर्व्यसनी लोकांच्या घरात आनंद साजरा होत असतो, तर व्यसनात बुडालेल्या लोकांच्या घरातील कुटुंबीय होळीच्या दिवशीसुद्धा दुखातच असतात. त्यामुळे होळीच्या सणानिमित्त दारूमुक्त होण्याचा संकल्प करून होळीच्या अग्नीत दारूच्या व्यसनाने दहन करा व धुलिवंदनाची मजा लुटा, असे आवाहन युवा सामाजिक कार्यकर्ते विश्वरत्न रामटेके यांनी होळीच्या सणानिमित्त केले आहे.

युवकांनो, जरा जपून

धुलिवंदन म्हटला की, युवकांच्या उत्साहाला प्रचंड उधाण येते. काहीतरी वेगळे करण्याच्या नादात काही युवक मद्यधुंद होत धुळवड खेळतात. परिणामी काही दिवसानंतर आरोग्याचे मोठे प्रश्न उद्भवत असतात.

# पंढरपूर तालुका शिक्षण सोसायटीचे संचालक नामदेव देशमुख यांचा नागेश फाटे यांच्या हस्ते सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : पंढरपूर तालुका शिक्षण सोसायटीच्या संचालकपदी नामदेव ज्ञानोबा देशमुख यांची निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी बोलताना नागेश फाटे म्हणाले की शालेय व उच्च शिक्षणामध्ये गुणवत्तेची जोपासना केली जात असल्याने विद्यार्थी घडत आहेत. पुढील काळात विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबवण्यात यावे. शाळा,वस्तीगृहे आणि कॉलेज इमारतींचे व्यवस्थापन व सुधारणा चांगल्या पद्धतीने करण्यात यावी.भारतीय संस्कृती व सभ्यता यांचे जतन करणारे तसेच तंत्रप्रेमी व राष्ट्रप्रेमी विद्यार्थी घडावेत अशी अपेक्षा फाटे यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी उद्योजक नवनाथ बचुटे, डॉ रमेश फाटे, नवनाथ फाटे, शशिकांत शर्मा, निवृत्ती पाटील, कल्पक नामदेव देशमुख, उदय आदमिले आदी उपस्थित होते.

# एसटीचे स्मार्ट कार्ड घेण्यासाठी बस स्थानकामध्ये रांगा: कार्ड घेण्यास विलंब होत असल्याने नागरिक त्रस्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : एसटीची सवलत घेणाऱ्या प्रवाशांना राज्य परिवहन महामंडळाने कार्ड घेणे सक्तीचे केले आहे. हे कार्ड घेण्यासाठी बस स्थानकामध्ये नागरिकांना विलंब लागत आहे. कार्ड देण्यासाठी एकच कर्मचारी असल्याने त्याच्या संमतीने काम करत असल्यामुळे नागरिकांना त्याचा त्रास होत आहे.

शासकीय कार्यालयातून मिळणारी कागदपत्रे, दाखले, केंद्राकडून सुरत मिळत असल्यामुळे त्याचा फायदा नागरिकांना होत आहे.

मात्र राज्य प्रमाण महामंडळाकडून स्मार्ट कार्ड आपले सरकार नागरिकांची गरज होत असल्याचे दिसून येत आहे.

राज्य पूर्व मंडळाकडून ७५ वर्षे ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, व ६५ वर्षाखालील वयोगटातील नागरिक व महिलांना ५० टक्के सवलत दिले आहे यापुढेही सवलत चालू ठेवायचे असेल तर स्मार्ट कार्ड घेणे हे बंद करा केले आहे. स्मार्ट कार्ड घेण्यासाठी प्रत्येक नागरिकांना दोनशे रुपये खर्च लागत आहे.

देणारे कर्मचारी संत गतीने काम करत असल्यामुळे नागरिकांना रांगेत उभे लागत उभे राहावे लागत आहे. नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. सुविधा सरकार केंद्रातून सुरू करावी अशी मागणी होऊ लागली आहे.

# विषय - इराण-इराक येथील संभाव्य युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांसाठी महत्त्वाची सूचना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : इराण-इराक या देशांमध्ये संभाव्य युद्धजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन सोलापूर जिल्हा प्रशासनामार्फत नागरिकांसाठी आवश्यक सूचना जारी करण्यात येत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांचे नातेवाईक अथवा परिचित इराण किंवा इराक येथे वास्तव्यास असल्यास त्यांच्या सुरक्षिततेबाबत किंवा इतर कोणत्याही बाबतीत माहिती आवश्यक असल्यास संबंधितांनी जिल्हा प्रशासनाने स्थापन केलेल्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा.

या संदर्भात मंत्रालय, मुंबई येथील आपत्कालीन संचालन केंद्राशी (EOC) संपर्क साधण्यात आलेला असून, कोणत्याही नागरिकाकडून इराण-इराक येथे वास्तव्यास असलेल्या व्यक्तींबाबत चौकशी प्राप्त झाल्यास मंत्रालय नियंत्रण कक्षामार्फत संबंधित भारतीय दूतावासाशी संपर्क साधून त्या व्यक्तींच्या सुरक्षिततेबाबत माहिती प्राप्त करून ती संबंधितांना कळविण्यात येईल.

सदर बाबीची नोंद घेऊन नागरिकांनी आवश्यकतेनुसार खालील नियंत्रण कक्षांशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

नियंत्रण कक्ष संपर्क क्रमांक :

✻ जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर नियंत्रण कक्ष : ०२१७-२७३१०१२

✻ सोलापूर पोलीस शहर नियंत्रण कक्ष : ०२१७ - २७४४६०० / २७४४६२०

, सोलापूर पोलिस ग्रामीण नियंत्रण कक्ष: ०२१७-२७३२०००

✻ मंत्रालय नियंत्रण कक्ष, मुंबई : ९३२१५९०५६१

# कल्याणशेट्टी महाविद्यालयात डॉ. सी. व्ही. रमण जयंती निमित्त विविध कार्यक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : प्रख्यात भारतीय शास्त्रज्ञ सी व्ही रमण यांनी रामन परिणाम हा महत्त्वपूर्ण शोध लावला त्यामुळे त्यांना नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या कार्याचे स्मरण म्हणून कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विज्ञान विद्या शाखेच्या वतीने विज्ञान दिनानिमित्त थोर वैज्ञानिकांची यशोगाथा, प्रश्न उत्तरे, कॉम्पिटिशन सिरॅमिक रांगोळी आदी उपक्रम येऊन साजरा करण्यात आला.

डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचा विज्ञान विद्याशाखेतील विद्यार्थ्यांनी भारतीय संशोधकांनी लावलेल्या विविध शोधांची माहिती सांगितली, त्यानंतर प्राध्यापिका मनीषा शिंदे म्हणाल्या की, विज्ञान दिनाचा मुख्य उद्देश अंधश्रद्धा आणि अपप्रचार दूर करून तर्कशुद्ध विचार करण्याची सवय लागावी, विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड आणि जिज्ञासा निर्माण व्हावी, मोबाईल, संगणक, इंटरनेट, वैद्यकीय साधने, शेतीची उपकरणे या सर्व गोष्टी विज्ञानाची देणगी आहे. विज्ञानामुळे आरोग्य, शिक्षण व उद्योग या क्षेत्रामध्ये मोठी प्रगती झाली आहे. त्यामुळे विज्ञान दिन हा केवळ स्मरण दिन नसून विज्ञानाच्या उपयुक्ततेची जाणीव करून देणारा दिवस आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापिका विद्याश्री वाले यांनी केले. आभार प्राची गणेचारी यांनी मानले.

### विज्ञान विद्याशाखेचा उपक्रम

या कार्यक्रमास डॉ. बाळासाहेब पाटील, प्रा. सौरभ भस्मे, ओंकार घिवारे, विद्या बिराजदार, मधुबाला लोणारी उपस्थित होते

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# बार्टी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना प्रदेशात नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणार

## महासंचालक सुनील वारे; बार्टी करिअर अँड एम्प्लॉयमेंट फेअरला हजारो विद्यार्थ्यांची उपस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नांदेड/प्रतिनिधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीच्यावतीने आज नांदेडमध्ये अनुसूचित जातीच्या युवक- युवतींसाठी 'बार्टी करिअर अँड एम्प्लॉयमेंट फेअरचे आयोजन करण्यात आले होते. या फेअरला प्रचंड प्रतिसाद मिळाला. राज्यातल्या विविध जिल्ह्यातून तसेच शेजारील आंध्र प्रदेशातूनही काही विद्यार्थी या फेअरमध्ये सहभागी झाले होते.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संघर्षावर मात करून विदेशात उच्च शिक्षण घेतले. त्यांचा आदर्श आजच्या विद्यार्थ्यांनी डोळ्यासमोर ठेवून उच्च शिक्षण घ्यावे. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना बार्टी करिअर अँड एम्प्लॉयमेंट फेअरच्या माध्यमातून आखाती देशात रोजगारांच्या मोठ्या संधी उपलब्ध होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू असे महासंचालक सुनील वारे म्हणाले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे संस्थेच्य वतीने दिनांक शंकराव चव्हाण सभागृह नांदेड येथे बार्टी करिअर अँड एम्प्लॉयमेंट मेळावा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी नांदेडचे निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर बार्टीचे विभागप्रमुख डॉ.बबन जोगदंड, प्रेरणा कन्सलटन्सीचे अध्यक्ष प्रकाश बोडके, जनरल मॅनेजर फयाद गोली, रवींद्र दरेकर ,लॉ कालचे प्राचार्य एम. बी. अल्ली, बार्टीचे प्रकल्प व्यवस्थापक महेश प्रकल्प अधिकारी मनोज खंदारे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी या मेळाव्याचे प्रास्ताविक डॉ जोगदंड यांनी केले. ते म्हणाले की, मराठवाड्यातील मुलांना आखाती राष्ट्रात रोजगारांच्या मोठ्या संधी असून बार्टीने पहिला प्रयोग नांदेडमध्ये केला असून या पायलट प्रोजेक्टला मोठा प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. या उपक्रमाचा जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले.

निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांनी बार्टीच्या विद्यार्थ्यांना प्रदेशात जाण्यासाठी काही मदत लागली तर जिल्हा प्रशासन सर्व मदत करेल असे सांगितले

प्रेरणा कन्सलटन्सीचे अध्यक्ष बोडखे यांनीही विद्यार्थ्यांना विदेशी नोकरीची प्रक्रिया समजून सांगितली. यावेळी रवींद्र दरेकर, आणि फैयाद गोली यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले .हा मेळावा यशस्वी होण्यासाठी प्रकल्प अधिकारी मनोज खंदारे, मुंजाजी कांबळे, रामदास लोखंडे, यांच्यासह बार्टीचे समतादूत यांनी मेहनत घेतली. सूत्रसंचालन अविनाश नाईक व सोनू दरेगावकर यांनी केले आभार महेश गवई यांनी मानले.



## पंढरपूर तालुका पोलिसांची मोठी कारवाई चळे गावातून अवैधरित्या वाळू वाहतूक आयशर टेम्पो एकूण किंमत दहा लाख बारा हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे पाचच्या सुमारास पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी श्री प्रशांत डगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली चळी गावातील दरलींग मंदिर रोड, परिसरात भीमा नदीपात्रालगत असलेले ठिकाणी वैदरीत्या आयशर कंपनीचा टेम्पो क्रमांकज्ञश्र १० ु९६६३ या आयशर टेम्पोमध्ये टेम्पो चालक समाज गायकवाड राहणार तळे हा आपल्या ताब्यात अवैधरित्या महाराष्ट्र शासनाची मालकीची भीमा नदी पात्रातील वाळू सदर टेम्पोमध्ये चोरून घेऊन जात असताना त्यास ताब्यात घेऊन पंढरपूर तालुका पोलिसांनी सदर शुभम गायकवाड राहणार चळे गाव तालुका पंढरपूर इशार टेम्पो चा मालक यांच्याविरुद्ध भारतीय नाम संहिता कलम ३०५ ३०३ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला असून सदर आरोपीकडून एकूण तोंड ब्रास वाळू व आशार कंपनीचा टेम्पो अशा एकूण दहा लाख १२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त करून ताब्यात घेतलेल्या आहे. आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केलेला आहे.

सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक साहेब श्री अतुल कुलकर्णी साहेब माननीय अप्पर पोलीस अधीक्षक साहेब श्री प्रीतम यावलकर माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी श्री प्रशांत डगळे साहेब , पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर, एपीआय श्रीमती विभावरी रेडेकर मॅडम, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले. उपनिरीक्षक विक्रम वडणे. पोलीस हेड कॉन्स्टेबल मंगेश रोकडे, पोलीस स्वप्निल वाडदेकर, पोलीस कॉन्स्टेबल अभिमन्यू गरड, पोलीस हेड कॉन्स्टेबल सुहास देशमुख, दीपक भोसले पोलीस हेच कॉन्स्टेबल संजय गुटाळ इत्यादींनी काम केले.

## सुपतगाव येथे अखंड हरीनाम सोहळ्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा (प्रतिनिधी) : तालुक्यातील सुपतगाव येथे श्री संत तुकाराम महाराज बीजेनिमित्त दि. २ मार्च ते १० मार्च २०२६ या कालावधीत ६४ व्या वर्षानिमित्त भव्य 'श्री ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरीनाम सोहळा' तसेच 'सुपतगाव यात्रा महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचे व्यासपीठ प्रमुख म्हणून ह.भ.प. शिवहर भीमराव मुळे महाराज (सुपतगावकर) सेवा बजावत आहेत.




या नऊ दिवसांच्या सोहळ्यात सुश्राव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील महाराज मंडळी आपल्या वाणीने भाविकांना मंत्रमुग्ध करणार आहेत,

ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज दिंडेगावकर (प्रारंभिक दिवस),

ह . भ . प . शिवम् महाराज (अहिल्यानगर),ह.भ.प. किसन महाराज जगताप (वलांडी),

ह.भ.प. नितीन महाराज कवळी (हिप्परगा),

ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज माकणीकर,

ह.भ.प. वैभव महाराज भालकडे (कानेगाव),

ह.भ.प. तुकाराम महाराज हजारे (कोल्हापूर)

ह.भ.प.आप्पासाहेब महाराज दिंडेगावकर,

विशेष कार्यक्रम

सोहळ्यादरम्यान तुकाराम महाराज बीज (५ मार्च) वैकुंठगमन सोहळा दुपारी १२ वाजता पुष्पवृष्टी गुलाल उत्सव व एकनाथ महाराज षष्ठी (९ मार्च) निमित्त गुलालाचे विशेष कार्यक्रम होणार आहेत. सोहळ्याची सांगता दि. १० मार्च रोजी ह.भ.प. विठ्ठल आप्पासाहेब महाराज दिंडेगावकर आणि ह.भ.प. गुलाब पांचाळ महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी समस्त विश्वस्त मंडळ श्री मारुती देव मंदिर,ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. परिसरातील जास्तीत जास्त भाविकांनी या आध्यात्मिक पर्वणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## कोठुरे येथे राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : म.वि.प्र.संचलित स्वा. सावरकर विद्यालय कोठुरे येथे थोर भारतीय शास्त्रज्ञ सी व्ही रमण यांचा जन्मदिवस अर्थात राष्ट्रीय विज्ञान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या सर्वप्रथम सी व्ही रमण यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील सातपुते व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी भाग्यलक्ष्मी जाधव व सहकाऱ्यांचे विज्ञान गीत. ईश्वरी चांदोरे व सहकाऱ्यांची विज्ञान नाटिका.आदित्य चोबे व त्याच्या सहकाऱ्यांनी सादर केलेले नाटक व या नाटीकेत रुद्र चांदोरे या विद्यार्थ्याने साकारलेल्या स्त्री पात्राची वेशभूषेचे सर्वांनी विशेष कौतुक केले. विवेक उगले याने सीपीआर पद्धती याबद्दल प्रात्यक्षिक सादर करून माहिती दिली.या कार्यक्रमात विविध इयत्तेतील विद्यार्थ्यांनी एपीजे अब्दुल कलाम, सी व्ही रमण, कल्पना चावला, आर्यभट यासह विविध भारतीय शास्त्रज्ञांची ओळख आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना करून दिली. नंतर विज्ञान छंद मंडळ समितीचे प्रमुख रोशन दवते यांनी विद्यार्थ्यांना श्रद्धा व अंधश्रद्धा यांच्यातील फरक समजावून सांगितला तसेच हृदयरोग या आजाराची लक्षणे, करावयाचे प्रथमोपचार याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. त्यानंतर स्वाती चिखले मॅडम यांनी विद्यार्थ्यांना समाजातील विविध अंधश्रद्धा उदाहरणांसह समजावून सांगितल्या तसेच



अंधश्रद्धा निर्मूलनासाठी नरेंद्र दाभोळकरांनी केलेल्या कार्याची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील सातपुते यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात हिंदू धर्मातील विविध प्रथा, परंपरांना असणारा विज्ञानाचा आधार विद्यार्थ्यांना विविध उदाहरणांद्वारे समजावून सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन त्रिशा मोगल व सई शेळके यांनी केले.

या कार्यक्रमासाठी विज्ञान विषय शिक्षक रामनाथ थोरात,अनिता पवार यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सुंदर फलक लेखन विद्यालयातील कलाशिक्षक सतीश गांगुर्डे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

### उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांचे प्रशासकीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाच्या अंमलबजावणीसाठी सिंदखेडराजा प्रशासन सज्ज




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी कामाला लागण्याच्या तहसीलदार अजित दिवटे यांनी दिल्या सूचना

महाराष्ट्र शासनाचे महत्वकांक्षी असलेले 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' राबविण्यासाठी सिंदखेडराजा प्रशासन सज्ज झाले असून उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार अजित दिवटे यांच्या अध्यक्षतेखाली हे सर्व अभियान यशस्वीपणे पार पाडण्यासाठीची तयारी जोरात सुरु आहे.

या शिबिरामध्ये पुढील शासनाच्या विविध विभागाच्या देण्यात येणाऱ्या सेवा उपलब्ध असतील,

१) महसूल विभाग २) महिला व बालविकास विभाग ३) आरोग्य विभाग ४)सहकारी संस्था ५) एस. टी. महामंडळ ६)नगरपालिका ७) कृषी विभाग ८) पशु संवर्धन विभाग ९) दुय्यम निबंधक कार्यालय १०) वन विभाग ११) महाराष्ट्र विद्युत वितरण मंडळ १२) पंचायत समिती

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाची (टप्पा क्र. १) प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

१. लोकाभिमुख आणि गतिमान प्रशासन

महसूल विभागातील दैनंदिन प्रश्नांचे तातडीने निराकरण करून प्रशासन अधिक कार्यक्षम आणि लोकाभिमुख करणे हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. नागरिकांना 'डळपसश्रश ऊू डर्शीींळलश ऊश-श्रळींशीू' (एका दिवसात सेवा) प्रणालीद्वारे जलद गतीने सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

२.डिजिटल सेवांचा प्रसार आणि वापर

महाभूमी पोर्टल: ई-फेरफार, ई-मोजणी, ई-चावडी आणि ई-रेकॉर्ड्स यांसारख्या डिजिटल सेवांचे महत्त्व नागरिकांना पटवून दिले जाईल.

डिजिटल ७/१२: क्यूआर कोडयुक्त डिजिटल ७/१२ उताऱ्याला पूर्ण कायदेशीर वैधता प्राप्त झाली असून, आता तहसील कार्यालयात जाण्याची गरज नाही, याबाबत जनजागृती केली जाईल.

ई-मोजणी २.०: मोजणी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरून घेण्याबाबत मार्गदर्शन केले जाईल.

३. जमिनीशी संबंधित महत्त्वाचे फेरफार आणि दुरुस्ती

अभिलेख दुरुस्ती: ७/१२ मधील चुका दुरुस्त करण्यासाठी 'मदत कक्ष' (कशश्र ऊशीज्ञ) स्थापन केला जाईल.

प्रलंबित फेरफार: नगर भूमापन आणि गावठाण भूमापनाशी संबंधित प्रलंबित फेरफार प्रकरणे शिबिरातच निकाली काढली जातील.

कमी-जास्त पत्रके: भूसंपादन किंवा अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणांमध्ये प्रलंबित असलेली कमी-जास्त पत्रके तयार करून रेकॉर्ड अद्ययावत केले जाईल.

४. महसूल कायद्यातील सुधारणांची माहिती

अकृषिक (छ) परवानगी: अंतिम विकास आराखड्यातील जमिनीसाठी आता जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची गरज नाही, या नवीन बदलाची माहिती दिली जाईल.

तुकडेबंदी कायदा: ८ ऑगस्ट २०२३ च्या अधिसूचनेनुसार बागायत क्षेत्रासाठी १० गुंठे आणि जिरायत क्षेत्रासाठी २० गुंठे अशी नवीन प्रमाणभूत क्षेत्र मर्यादा लागू करण्यात आली आहे.

एकवेळचे अधिमूल्य: जुन्या अकृषिक आकारणीऐवजी आता क्षेत्रफळानुसार (उदा. १००० चौ.मी. पर्यंत ०.१%) एकवेळचे अधिमूल्य भरण्याची सोपी व्यवस्था करण्यात आली आहे.

५. एक खिडकी योजना (डळपसश्रश थळपवेु उश्रशरीरपलश)

शिबिराच्या ठिकाणी तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि तलाठी हे सर्व एकाच ठिकाणी उपलब्ध असतील, जेणेकरून नागरिकांना विविध कार्यालयांत फेऱ्या माराव्या लागणार नाहीत.

६. सामाजिक लाभ आणि विद्यार्थी साहाय्य

दाखले वाटप: शाळांमध्ये कॅम्प लावून विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेतले जातील आणि शिबिराच्या दिवशी त्यांना विविध दाखल्यांचे वाटप केले जाईल.

अर्थसहाय्य योजना: विविध सामाजिक योजनांच्या पात्र लाभार्थ्यांना शिबिरातच मंजुरी आदेशांचे वाटप केले जाईल.

शिबिराचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे,

१) सोनोशी, साखरखेर्डा मंडळ :- दिनांक ७ मार्च २०२६

२) किनगावराजा मंडळ :- दिनांक १४ मार्च २०२६

३) दुसरबीड मंडळ :- दिनांक १० एप्रिल २०२६

४) मलकापूर पांग्रा मंडळ :- दिनांक १७ एप्रिल २०२६

५) सिंदखेडराजा मंडळ :- दिनांक ८ मे २०२६

६) शेंदुर्जन मंडळ :- दिनांक १५ मे २०२६

# ‘उमेद’च्या माध्यमातून राज्यातील सर्व महिलांना लखपती दीदी बनवण्यात येणार : पालकमंत्री जयकुमार गोरे

## रुक्मिणी महोत्सव व मिनी सरस जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन महोत्सवाचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका):- राज्यातील सर्व महिलांच्या सक्षम ीकरणासाठी राज्य शासन महिलांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. उमेद च्या माध्यमातून राज्यातील सर्व महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या माध्यमातून सर्व म हिलांना लखपती दीदी बनवण्याची ग्वाही राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज्यमंत्री चा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

नॉर्थ कोर्ट मैदान येथे ग्राम विकास व पंचायत राज विभाग जिल्हा परिषद सोलापूर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर उम ेद, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन- ोन्नती अभियान आयोजित रुक्मिणी महोत्सव व मिनी सरस जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन या कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करून उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त सचिन ओंबसे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा परिषद सदस्य चेतन केदार ,नगरसेविका रोहिणी तडवळकर, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा श्री. जगताप आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे म्हणाले की, महिला बचत गटांनी स्वतः उत्पादित केलेल्या मालांचे वस्तूचे विक्री व प्रदर्शन करण्यासाठी हक्काची बाजारपेठ मिळावी म्हणून हा मिनी सरस जिल्हा रुक्मिणी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महिलांची आर्थिक बळकटी व सक्षम ीकरणासाठी हा महोत्सव घेण्यात येतो. उमेद च्या माध्यमातून देशाचे

### जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी ५ मार्च पर्यंत या महोत्सवाला भेट देण्याचे आवाहन

पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहाव्या, त्यांना मानाने, सन्मानाने जगता यावे त्यांना मानाचे स्थान मिळावे यासाठी उमेदच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात, असे त्यांनी सांगितले.

तसेच महिला बचत गटाच्या माध्यमातून नवनवीन मोठे उद्य- ोग महिलांनी निर्माण करावे, तसेच प्रत्येक गावागावांमधून महिला बचत गटाच्या माध्यमातून प्रत्येक गावी एक प्रभाग संघ निर्माण व्हावे अशी भूमिका ठेवून आपण सर्वांनी काम करावे. गावातील दूध व्यवसाय करणाऱ्या महिलांनी स्वतःची दूध बँक तयार करावी. शेळ्या, मेंढ्या व गाई पालन हा व्यवसाय सर्वात जास्त पैसा मिळवून देणारा ग्रामीण भागातील व्यवसाय आहे. महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून उत्पादित केलेल्या मालाला चांगले पॅकिंग केले तर चांगला पैसा मिळतो. महिलांच्या उत्पादित मालाला हक्काची बाज- ारपेठ मिळण्यासाठी सोलापूर जिल्ह्यासाठी उमेद मॉल मंजूर केला गेला आहे, अशी ही माहिती पालकमंत्री श्री. गोरे यांनी दिली. उमेद मॉल मुळे सोलापूर जिल्ह्यातील महिलां च्या उत्पादित वस्तूंसाठी बारा महिने हक्काची बाजारपेठ मिळणार आहे . राज्यातील जवळपास सर्व जिल्ह्यात मुख्यमंत्री महोदयांनी असे मॉल मंजूर केले आहेत. तसेच गावांमध्येमहिला बचत गटाच्या बैठकीसाठी हक्काचे कार्यालय निर्माण करून देण्याचा प्रस्ताव आम्ही शासनाकडे सादर



केला जाणार असल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

महिला स्वयंसहायता समूहांना कर्ज वाटप धनादेश वितरण-

कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर महिला बचत गटांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल बक्षीस वितरण करण्यात आले यामध्ये महिला स्वयंसहायता समूहांना समुदायिक गुंतवणूक निधी ३२ कोटी ९ लाख ४० हजार रुपये चा धनादेश देण्यात आला, तसेच महिला स्वयं सहायता समूह बँक कर्जवाटप २ कोटी २५ लाख रुपयांचा धनादेश वितरित करण्यात आला. उमेद अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील पहिल्या महिला फेडरेशनच्या नोंदणी पत्राचे वितरण करण्यात आले. सन २०२५ - २६ अंतर्गत वार्षिक कृती आराखडा मधील सर्व उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल प्रत्येक तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाचा प्रमाणपत्र देऊन सत्कार पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आला. व त्यानंतर पालकमंत्री महोदयांनी महोत्सवातील प्रत्येक स्टॉलला भेट देऊन पाहणी केली.

या महोत्सवात महिला बचत गटांचे ८० स्टॉल लागलेले आहेत. तरी सोलापूर जिल्ह्या- तील जास्तीत जास्त नागरिकांनी या स्टॉलला भेट देऊन महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची खरेदी करावी असे आवाहन करण्यात आले. हे प्रदर्शन नॉर्थ कोर्ट मैदान येथे दिनांक १ ते ५ मार्च २०२६ या कालावधीत आहे. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व सम ारोप प्रकल्प संचालक श्री. जगताप यांनी केले.

# आंतर महाविद्यालयीन कराटे स्पर्धेत कर्मवीर महाविद्यालयाचा दमदार विजय; लक्ष्मी मानेची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्या- पीठ आयोजित आंतर महाविद्यालयीन कराटे स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

महाविद्यालयाची ५५ किलो वजन गटातील खेळाडू लक्ष्मी माने (बी.सी.ए. द्वितीय वर्ष) हिने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्ण पदक पटकावला. आपल्या जिद्द, चिकाटी आणि अचूक तंत्राच्या जोरावर तिने प्रतिस्पर्ध्यांवर मात करत सुवर्णयश मिळवले. तिच्या या देदीप्यमान काम गिरीच्या जोरावर तिची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कराटे स्पर्धे साठी निवड झाली आहे. ही बाब म हाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानाची ठरली आहे.

तसेच अतुल चव्हाण (बी.ए. द्वितीय वर्ष) यांनीही उत्कृष्ट लढत देत रौप्य पदक मिळवले आहे. त्याने महाविद्यालयाचा गौरव वाढवला. त्यांच्या संयमी व आत्मविश्वासपूर्ण खेळामुळे स्पर्धेत त्याची विशेष छाप पडली.

या दोन्ही खेळाडूंच्या यशामुळे म हाविद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून प्राचार्य डॉ. बी. टी.जाधव, उपप्राचार्य डॉ भगवान नाईकनवरे, डॉ. राजेश कवडे, डॉ. सुशील शिंदे, विविध विभागांचे अधिष्ठाता, विभाग प्रम ुख, क्रीडा विभागप्रमुख प्रा.अनिल परमार, प्रा.विठ्ठल फुले, प्रा.मनोज खपाले, व सर्व प्राध्यापकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या कठोर परिश्रमाला आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाला या यशाचे श्रेय दिले जात आहे.

या उल्लेखनीय यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात प्रेरणा मि ळणार असून भविष्यातही अशाच यशाची परंपरा कायम राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# खामसवाडी येथे शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना; अध्यक्षपदी राजकुमार शेळके तर उपाध्यक्षपदी श्रीनिवास झोरी यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी/प्रतिनिधी हनुमंत पाटुळे : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकिचे आयोजन दि.२८फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले होते.

यावेळी माजी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा श्रीमती रोहिणी माळी यांचे अध्यक्षतेखाली नवीन शाळा व्यवस्थापन समितीची खेळीमेळीच्या वातावरणात बैठक घेऊन निवड करण्यात आली.

या बैठकीमध्ये सर्वानुमते अध्यक्ष म्हणून राजकुमार विक्रम शेळके यांची तर उपाध्यक्ष म्हणून श्रीनिवास गोरख झोरी यांची निवड करण्यात आली. तर सदस्य पदी श्रीमती दिपाली ईश्वर डोईफोडे, प्रियांका अमोल नागुलकर, कोमल परमेश्वर सौदागर, माध- ुरी संजय झोरी, सुरेश महादेव पाटोळे, शुक्राचार्य शिवाजी कोळी,वाजेद नजीर आत्तार, महेश शेषेराव शेळके यांची निवड करण्यात आली.

यावेळी शाळेतील शिक्षक, पालक म ोठया संख्येने उपस्थित होते. सदरील नवीन शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सह सर्व सदस्यांचे ग्रामस्थांमधुन अभिनंदन होत आहे.

# खग्रास चंद्रग्रहणानिमित्त श्रींच्या नित्योपचार वेळेत बदल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : दिनांक ३ मार्च रोजी खग्रास चंद्रग्रहण असल्याने श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी माता यांच्या नित्योपचार व पूजाविधीच्या वेळेत शास्त्रोक्त नियमानुसार आवश्यक बदल करण्यात येत आहेत.

पंचांगानुसार ग्रहणाचा स्पर्श सायं. ०६.३४ वा. असून मोक्ष सायं. ०६.४८ वा. आहे. पंढरपूर येथे सूर्यास्त सायं. ०६.३४ वा. होत असल्याने सायं. ०६.३४ ते ०६.४८ (एकूण १४ मिनिटे) या कालावधीत ग्रहण नियम पाळण्यात येणार आहेत.

ग्रहण काळातील प्रमुख बदल पुढीलप्रम ाणे :

काकड आरती व नित्यपूजा - पहाटे ०४.०० ते ०५.५५ वा. नेहमीप्रमाणे.

महानैवेद्य - सकाळी १०.४५ ते ११.०० वा. महानैवेद्यामध्ये नेहमीचा नैवेद्य दाखविण्यात येणार नाही. त्याऐवजी सुकामेवा नैवेद्य दाखविण्यात येईल.

पोशाख / दुपारचा नैवेद्य (४.३० ते ५.०० वा.) ग्रहणाचा वेध सुरू होणार असल्याने लाडूचा नैवेद्य दाखविण्यात येणार नाही. त्याऐवजी सुकामेवा दाखविण्यात येईल.

ग्रहण स्पर्शानंतर (सायं. ०६.३४ वा.)

श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी माता तसेच मंदिरातील व मंदिराबाहेरील सर्व परिवार देवतांना चंद्रभागा नदी (भीमा) नदीचे पाणी आणून स्नान घालण्यात येईल. ग्रहण म ोक्षानंतर (सायं. ०६.४८ वा.) सर्व देवतांना पुनः स्नान घालून शुद्धीकरण विधी पूर्ण करण्यात येईल.

धुपारती - रात्री ०९.३० वा. शेजारती - रात्री १२.०० वाजे नंतर नेहमीप्रमाणे होईल.

खग्रास चंद्रग्रहणाच्या पार्श्वभूमीवर श्रींच्या नित्योपचारात वरीलप्रमाणे बदल करण्यात येत असून, भाविकांनी दर्शन व पूजाविधीच्या वेळेत याची नोंद घ्यावी, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

### तळवली-अर्जुनली ग्रुप ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष ; नागरिकांत जीवितहानीची भीती

# पडघ्यात ड्रेनेज चेंबरचे झाकण उचलले; गंभीर अपघाताचा धोका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील तळवली-अर्जुनली ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील पडघा येथे भाद- णे पुलाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर ड्रेनेज लाईनच्या चेंबरचे झाकण गेल्या चार दिवसांपासून विस्कटलेल्या अवस्थेत असून वाहनचालक आणि पादचाऱ्यांसाठी गंभीर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. सदर झाकण अर्धवट खाली गेले असून अर्धवट वर आलेले असल्याने ते असंतुलित स्थितीत आहे.

या मार्गावर दुचाकी, चारचाकी आणि रिक्षांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. पुढे शाळा असल्याने सकाळी व दुपारी विद्यार्थी व पालकांची गर्दी होते.

अशा परिस्थितीत रस्त्याच्या मध्यभागी असलेले धोकादायक चेंबर केव्हाही मोठ्या अपघाताला कारणीभूत ठरू शकते, अशी भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. विशेषतः आठवडा बाजाराच्या दिवशी या रस्त्यावरून नागरिकांची मोठी ये-जा होत असल्याने धोका अधिक वाढला आहे.

स्थानिकांच्या मते, सुमारे चार दिवसांपूर्वी या तुटलेल्या चेंबरबाबत संबंधित प्रशासनाला माहिती देण्यात आली होती.

काही महिन्यांपूर्वीही याच ठिकाणी चेंबरचे झाकण तुटले होते. तेव्हा दुरुस्ती करण्यात आली; मात्र झाकण नीट बसविण्यात न आल्याने काही महिन्यांतच पुन्हा झाकण आत गेले असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

पत्रकार कैलास ढमणे यांनीही घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ तळवली- अर्जुनली ग्रुप ग्रामपंचायतीला कळविले आहे. तरीही अद्याप ठोस कारवाई न झाल्याने ग्रामपंचायतीकडून दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. अशा निष्काळजीपणामुळे एखादा अपघात होऊन जीवितहानी झाली तर जबाबदार कोण? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. संबंधित प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करून अपघाताचा धोका दूर करावा, अशी सर्वसाम ान्यांची मागणी आहे. आता ग्रामपंचायत त्वरित उपाययोजना करते की एखादी दुर्घटना घडण्याची वाट पाहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# उटी (बु) ग्रामपंचायत अंतर्गत सन्मानाचा ऐतिहासिक विधवा महिला सन्मान उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




औसा प्रतिनिधी/अमर जाधव : तालुक्यातील ग्राम पंचायत उटी बु. येथे समाजाच्या रूढी-परंपरांना थेट आव्हान देणारा आणि स्त्री सन्मानाचा बुलंद नारा देणारा ऐतिहासिक निर्णय प्रत्यक्षात उतरला आहे. मासिक सभा, महिला सभा व ग्रामसभेत ठराव मंजूर करून ‘विधवा महिला सन्मान उपक्रम’ राबविण्याचा धाडसी निर्णय घेण्यात आला होता. त्या निर्णयाची अंमलबजावणी करत दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी ग्रामपंचायतीमार्फत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात समाजा- तील अन्यायकारक, वेदनादायक आणि स्त्रीचे स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या परंपरांना कायमची मूठमाती देत विधवा महिलांनी ग्रामपंचायतीकडून देण्यात आ- लेला साज - मंगळसूत्र, जोडवे, बांगड्या, साडी व कुंकू - सन्म ानाने धारण केला. हा केवळ दागिन्यांचा स्वीकार नव्हता, तर स्त्री आत्मविश्वास, स्वाभिमान आणि सामाजिक परिवर्तनाचा ऐतिहासिक क्षण होता.

**परंपरेच्या बेड्या तोडणाऱ्या महिला पुढे सरसावल्या**

या उपक्रमात सरिता संपत गाडेराव, वर्षा मारुती घोडके, निलाबाई बालाजी सोनवणे, उर्मिला संजय इंगळे या विधवा महिलांनी सहभाग नोंदवून सम ाजाला ठाम संदेश दिला की, विधवापण म्हणजे आयुष्य संपणे नव्हे, तर सन्मानाने जगण्याचा अधिकार अबाधित आहे.

**ग्रामपंचायतीचा ठाम सामाजिक संदेश**

कार्यक्रमास माजी सरपंच ड. भालचंद्र पाटील, सरपंच वैशाली कांबळे, उपसरपंच रफिक शेख, ग्रामपंचायत अधिकारी महेश जगताप, ग्रामपंचायत सदस्य भागवत लोंढे, अनुसया भोज- ने, प्रयागबाई तानाजी कांबळे, व्हॉइस चेअरमन दशरथ कांबळे तसेच कर्मचारी महालिंग स्वामी, गुंडू भोकरे, अमर उबाळे, लक्ष्मण घोडके व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

**ज्येष्ठांचा भावनिक स्वीकार – परिवर्तनाला सामाजिक मान्यता**

गावातील ज्येष्ठ ग्रामस्थ भानुदास ईंगळे, यांनी या उपक्रम ाचे मनापासून स्वागत करताना सांगितले.

मुलाच्या निधनानंतर माझी सुनबाई विधवा झाली होती. परंपरेनुसार तिने मंगळसूत्र- बांगड्या काढून टाकल्या होत्या. मात्र ग्रामपंचायतीने ही चुकीची व अन्यायकारक प्रथा मोडीत काढली. आज विधवा महिलांनी सन्मानाने साज धारण केला - हा क्षण समाजाच्या विचारध- ारेला कलाटणी देणारा आहे.

**उटी बु. ठरते परिवर्तनाचे मॉडेल**

अनावश्यक रूढी-परंपरा नष्ट करून महिलांना सन्मानाने, आत्मविश्वासाने व समानतेने जगण्याचा अधिकार देण्यासाठी ग्रामपंचायत उटी बु. कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. हा उपक्रम संपूर्ण तालुक्यासाठी व जिल्ह्यासाठी आदर्श ठरणारा सामाजिक परिवर्तनाचा ठोस नमुना ठरत आहे.